


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०१ ● अंक : ३४४ ● पुणे ● बुधवार, दि. २३ ऑक्टोबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



मा. सचिन दोडके "सुसाट" 3



शिरूर-हवेलीत महाविकास आघाडीला भगदाड 4

## ठळक बातम्या

### सफाई कामगार महिलेचा मृत्यू

**खराडी : (आरंभ पर्व)** मोटारीच्या धडकेत पदपथावरील गवत काढणाऱ्या सफाई कामगार महिलेचा मृत्यू झाल्याची घटना मुंढवा-खराडी रस्त्यावर घडली. याप्रकरणी चंदननगर पोलिसांनी मोटार चालकाला अटक केली. राजेंद्र ज्ञानोबा धुमाळ (वय 52, रा. रायकर मळा, धायरी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे छाया मंगेश पेढारकर (वय 39, रा. खराडी) असे अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत ज्योती लोखंडे (वय 37, रा. हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे. सोमवारी (21 ऑक्टोबर) सकाळी अकराच्या सुमारास मुंढवा पुलाकडून खराडी गावाकडे येणाऱ्या रस्त्यावर ही घटना घडली.

### फसवणूक झाल्याने आत्महत्या

**पुणे : (आरंभ पर्व)** आर्थिक फसवणुकीमुळे व्यापाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भवानी पेठ परिसरात घडली. याप्रकरणी खडक पोलिसांनी सातजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. रमजान अली साचे (वय 44, रा. भवानी पेठ) हे आत्महत्या केलेल्या व्यापाऱ्याचे नाव आहे. याबाबत रमजान यांच्या पत्नीने खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी सुनील बेले, अफसर शेख, मतीन शेख, हैदर शेख, असिफ, मुजम्मिल पटवेकर, संजीव बजारमठ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. साचे यांचा कपड्यांचा व्यवसाय होता. त्यांची पत्नी एका शाळेत शिक्षिका आहे. रमजान यांना गुंतवणुकीवर परतावा देण्याचे आमिष दाखवून आरोपींनी त्यांच्याकडून 50 लाख रुपये उकळले.

# खडकवासल्यात मनसेचा मोठा गेम

## खडकवासला मतदारसंघात दिवंगत मनसे आमदार रमेश वांजळे यांचे पुत्र मयुरेश वांजळे यांना तिकीट




**पुणे (दै. आरंभ पर्व)** विधानसभा निवडणुकीसाठी मनसेनं स्वबळाचा नारा दिला आहे. त्यात महाराष्ट्र दौऱ्यावर असताना राज ठाकरेंनी काही उमेदवारांची घोषणा केली होती. त्यानंतर आज मनसेची 45 जणांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत राज ठाकरे यांचा मुलगा अमित ठाकरे माहिम मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत तर वरळीत आदित्य ठाकरेंच्याविरोधात संदीप देशपांडे यांना मनसेने उमेदवारी दिली आहे.

विशेष म्हणजे या यादीत मनसेनं खडकवासला मतदारसंघात दिवंगत मनसे आमदार रमेश वांजळे यांचे पुत्र मयुरेश वांजळे यांना तिकिट दिले आहे. त्यामुळे खडकवासला मतदारसंघात तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे. 2009 च्या निवडणुकीत राज ठाकरे यांच्या मनसेनं 13 आमदार निवडून आणले होते. त्यातील



खडकवासला मतदारसंघात रमेश वांजळे हे विजयी झाले होते. वांजळेच्या रूपाने मनसेला खडकवासला मतदारसंघात आमदार मिळाला होता. त्यानंतर वांजळे यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाने राष्ट्रवादी काँग्रेसची वाट धरली होती.

### गोल्डनमॅन म्हणून रमेश वांजळे प्रसिद्ध

मयुरेश वांजळे यांचे वडील रमेश वांजळे हे मनसेचे गोल्डनमॅन म्हणून नावारुपास आले. २००९ मध्ये रमेश वांजळे यांनी मनसेच्या तिकिटावर भाजपा आणि राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा पराभव केला. मनसेचे आमदार असताना रमेश वांजळे यांनी मनसे स्टाईलनं अनेक आंदोलने गाजवली. २०११ साली रमेश वांजळे यांचे निधन झालं. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अनेकदा त्यांच्या भाषणातून रमेश वांजळे यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. राज ठाकरे एकदा भाषणात रमेश वांजळे यांच्याविषयी बोलताना भावूकही झाल्याचं लोकांनी पाहिले होते. आता २०२४ च्या निवडणुकीत पुन्हा एकदा वांजळे कुटुंब मनसेशी जोडले गेले आहे.

खडकवासला पोटनिवडणुकीत मनसेनं उमेदवार उतरवला नाही. मात्र त्याठिकाणी राष्ट्रवादीकडून लढणाऱ्या वांजळे यांच्या पत्नीचा पराभव झाला आणि तिथून भाजपाचा उमेदवार निवडून आला. खडकवासला मतदारसंघात मागील 2 टर्म भाजपाचा आमदार निवडून येत आहे. या मतदारसंघात मनसेला मानणाराही मोठा वर्ग आहे. खडकवासला मतदारसंघात गेल्या काही महिन्यांपासून रमेश वांजळे यांचे सुपुत्र मयुरेश वांजळे विधानसभा लढवण्याची तयारी करत आहेत. याठिकाणी महायुती आणि मविआकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता कमी असल्याने वांजळे कुटुंब पुन्हा एकदा मनसेत आलं आहे.

# पुण्याचा नवा कारभारी कोण?

**पुणे (दै. आरंभ पर्व)** पुण्याचा चौफेर विकास होऊ लागल्याने मतदारांची संख्या आणि मतदारसंघही वाढत गेले. त्याचबरोबर पुण्याचा कारभार सांभाळणारे नेतृत्वही काळानुसार बदलत गेले आहे. राज्यात आणि महापालिकेत एकाच पक्षाची सत्ता असल्यास त्या पक्षाचा खासदार हा पुण्याचा कारभारी म्हणून सक्षमपणे काम पाहत आल्याचे आजवर दिसून आले आहे. मात्र, राज्यात आणि महापालिकेत सत्ता विरुद्ध पक्षाची असल्यास खासदाराचे कारभारी होण्याचे प्रयत्न अपयशी ठरलेले दिसतात. आगामी विधानसभा निवडणुकांनंतर तर पुण्यात वेगळेच चित्र पहायला मिळणार आहे. महायुती विजयी झाल्यास त्यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या रार्ष्ट्रवादी काँग्रेसचा सहभाग असणार आहे, तर महाविकास आघाडीला यश मिळाल्यास राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचा वाटा असणार आहे. त्यामुळे भाजप-शिवसेना शिंदे पक्ष असो की, काँग्रेस-शिवसेना ठाकरे पक्ष त्यांना 'राष्ट्रवादी'चा अडथळा असणार आहे. त्यामुळे पुण्याचा नवा कारभारी कोण, याचे त्रांगडे राहणार आहे.

पुणे नगरपालिका असल्यापासून ते आतापर्यंतच्या काळाचा विचार करता विशिष्ट कालावधीनंतर पुण्याचे कारभारी हे बदलत गेलेले दिसतात. काकासाहेब गाडगीळ हे खरेतर पुण्याचे पहिले कारभारी म्हणावे लागतील. 1928 ते 1932 या काळात ते तत्कालीन पुणे नगरपालिकेचे सभासद होते. 1928 मध्ये ते नगरपालिकेत निवडून आले. मात्र, 1930 मध्ये सत्याग्रहात भाग घेतल्याने त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात आले. मात्र, तुरुंगातून बाहेर आल्यावर ते पुन्हा बिनविरोध निवडून आले आणि नगरपालिकेचे उपाध्यक्ष म्हणूनही निवडून आले. 1938 मध्ये काँग्रेस पक्षाने पुणे नगरपालिकेची निवडणूक लढवली आणि काकासाहेब गाडगीळ हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियंत्रण मंडळावर सभासद म्हणून निवडून आले आणि ते अध्यक्षही झाले. त्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाल्याने पुण्यावर काँग्रेसची सत्ता होती आणि काकासाहेब गाडगीळ हे पुण्याचे कारभारी म्हणून कामकाज पाहत होते. काँग्रेसनंतर पुण्यावर समाजवादी चळवळीचा प्रभाव होता. त्या वेळी समाजवादी नेत्यांच्या हाती पुण्याची सूत्रे होती. ना. ग. गोरे, एस. एम. जोशी यांनी पुण्याचा कारभार सक्षमपणे पाहिला. 1957 च्या लोकसभा निवडणुकीत प्रजा समाजवादी पक्षाकडून गोरे हे खासदार म्हणून निवडून आले. गोरे यांनी पुण्याचे महापौरपदही भूषविले होते. 1967 च्या लोकसभा निवडणुकीत संयुक्त समाजवादी पक्षाकडून एस. एम. जोशी हे पुण्याचे खासदार म्हणून निवडून आले. 1970 पर्यंत पुण्याचा कारभार समाजवादी विचारवंतांनी हाकला. त्यानंतर पुन्हा बदलाचे वारे वाहू लागले आणि माजी केंद्रीय मंत्री मोहन धारिया यांच्याकडे काही काळ पुण्याचे नेतृत्व होते.




# खडकवासला भाजपच्या हातून जाणार !

## लॉबिंग करायला गेलेल्या भाजपच्या माजी नगरसेवकांची खरडपट्टी

**पुणे (दै. आरंभ पर्व)** विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला मंगळवारपासून सुरुवात होऊनदेखील अनेक ठिकाणी अजून उमेदवार निश्चित झालेले नाहीत. खडकवासला विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे जाणार असल्याचे सूतोवाच मिळताच शहर भाजपच्या पोटात गोळा आला आहे.

हा मतदारसंघ वाचविण्यासाठी भाजपच्या माजी नगरसेवकांनी मुंबई गाठली खरी, पण मुंबईत वरिष्ठ नेत्यांनी या माजी नगरसेवकांची खरडपट्टी काढल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यामुळे हा मतदारसंघ राष्ट्रवादी अजित पवार गटाला ,सोडण्याबाबत जवळपास निर्णय झाल्याची चर्चा आहे.

खडकवासला मतदारसंघातील विद्यमान आमदार भीमराव तापकीर यांना भाजपने 'होल्डवर' ठेवले आहे. विद्यमान आमदारांना विरोध असल्याने त्यांच्या जागी पर्यायी उमेदवार देण्याच्या हालचाली



सुरू होत्या. मात्र, पोर्शे अपघात प्रकरणावरून सुनील टिंगरे वादाच्या भोवऱ्यात अडकल्याने त्याचे विरोधकांकडून भांडवल व्हायला नको म्हणून मतदारसंघ अदलाबदल करण्याचा नवीन फॉर्म्युला चर्चेत आला. भाजपला वडगाव शेरी आणि त्याबदल्यात खडकवासला मतदारसंघ राष्ट्रवादी अजित पवार गटाला देण्याबाबत निर्णय जवळपास झाल्याची चर्चा कानावर येताच शहर भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी रात्री ११च्या सुमारास बैठक घेतल्याचे बोलले जात आहे. काही करून आपला हक्काचा मतदारसंघ न सोडण्याचा निर्णय बैठकीत झाला. त्यानुसार खडकवासला मतदारसंघातील काही माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

विद्यमान आमदारांना उमेदवारी द्यायची नसेल तर भाजपच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याला उमेदवारी द्यावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी बावनकुळे यांच्याकडे केली. मात्र, सर्व्हेमध्ये खडकवासला मतदारसंघ हातातून जात असल्याचे दाखवीत असताना भाजपकडे पर्यायी उमेदवार का तयार झाला नसल्याचा जाब बावनकुळे यांनी विचारल्याची चर्चा आहे. मग भाजप पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. 'पक्ष कोणाला उमेदवारी द्यायची, हे ठरवेल. तुम्ही संघटनेचे काम करा,' असे फडणवीस यांनी सांगितल्याचे समजते.

### अजित पवार गटाला का हवाय खडकवासला?

'खडकवासला'तून राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाकडून इच्छुक असलेले जिल्हा बँकेचे विकास दांगट यांचे काम करण्यास भाजपचे नेते तयार नाहीत. गेल्या पाच ते सात वर्षांपासून राजकारणापासून दूर राहिलेले आणि भाजपच्या एका नगरसेवकाने पालिका निवडणुकीत पराभव केल्याने दांगट यांना भाजपकडून विरोध आहे. तर, मतदारसंघातदेखील एखादा टापू वगळता अजित पवार गटाची फार ताकद नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अजित पवार गटाला हा मतदारसंघ का हवाय? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित झाला असून, आत्ता मतदारसंघ ताब्यात घेऊन भविष्याची ही साखरपेरणी आहे का? असा प्रश्नही उपस्थित झाला आहे.

### मतदारसंघ गमावून भाजपला काय मिळणार?

विद्यमान आमदार तापकीर यांना पक्षाअंतर्गत विरोध असून, भाजपला या मतदारसंघात विजयाची खात्री नसल्याचे बोलले जात आहे. खडकवासलात भाजप इच्छुकांचीदेखील मोठी संख्या आहे. मात्र, पक्षाअंतर्गत पर्यायांचा विचार न करता मतदारसंघ अजित पवार गटाला देऊन भाजपला काय मिळणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



# गुन्हेगारांची मानसिकता



*आपल्यावर अन्याय झाला म्हणजे आपण स्वतः गुन्हेगार होणे योग्य नाही. जाणून घ्या गुन्हेगारांची मानसिकता... आपण अनेकदा बघतो की कुटुंबात, समाजात सगळीकडेच एकमेकांवर अन्याय, अत्याचार, अपमान, छळ, चूक नसतानाही त्रास सहन करावा लागणे हे होत असते. कोणतेही घर, कोणतीही व्यक्ती, कोणताही समाज याला अपवाद नाही. हा त्रास अगदी आपल्या लहानपणापासून झालेला असतो, तर कधी अगदी आपण वयोवृद्ध होईपर्यंत इतरांच्या चुकांची शिक्षा भोगत असतो. अनेकदा आपण आपल्याला झालेला त्रास, आपल्यावर कोणीही केलेला अन्याय, अत्याचार यामुळे खूप छळ, मनस्ताप, मान हानी, आर्थिक नुकसान सहन केलेले असते. अनेकदा भलत्याच व्यक्तीच्या चुकीमुळे अनेक कुटुंब, घराणे उद्ध्वस्त झालेले असते. पुढील पिढीचे नुकसान, घरातील लोकांची भावनिक, मानसिक हानी झालेली असते.*

माजात जेव्हा आपण कोणतेही गुन्हे घडताना पाहतो, मग ते वैयक्तिक पातळीवर केलेले असोत, सामुदायिक स्वरूपात केलेले असोत, वैयक्तिक द्वेष, चीड आणि वैमानस्यातून घडलेले असोत, कोणत्याही जात, धर्म, पंत, प्रांत, पक्ष यांच्यामधील तेढ असो यामागे एकमेकांप्रति खूप खोलवर रुजलेला, खूप जुना साठून असलेला राग ठासून भरलेला असतो. आपण सगळ्यांनी अन्यायाविरुद्ध जरूर लढावे, अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा चुकीचा असतो असे आपण कायम म्हणतो. व्यक्ती कोणीही असो, कितीही सुशिक्षित असो, गरीब असो श्रीमंत असो, लहानपणापासून आपल्यावर झालेले संस्कार, आपल्याला इतरांकडून मिळालेली माहिती, आपल्याला ठासून सांगण्यात आलेले विचार, आपल्यावर बिंबलेल्या घटना मग त्या कितपत सत्य-असत्य, योग्य-अयोग्य याची शहानिशा न करता एखाद्याबद्दल आपले बनवले गेलेले मत यातूनच आपल्याला कोणाहीबद्दल प्रचंड तिरस्कार, द्वेष हा निर्माण होत असतो आणि दिवसेंदिवस तो वाढत असतो.

आपण स्वतःच्या मनाने बुद्धीने विचार करायला सक्षम झाल्यावर पण परत कोणत्या प्रकारच्या लोकांच्या संगतीत येतो, आपल्यात खुनशी वृत्ती, दुश्मनी, बदल्याची भावना, बेरडपणा, निगरगट्टपणा फोफावतो की कितीही नकारात्मक परिस्थितीमधून आपण स्वच्छ, नैतिकतेचा, चारित्र्य संपन्न मार्ग स्वीकारण्यासाठी आपल्यात आत्मविश्वास आणि वैचारिक प्रगल्भता कितपत येते यावर आपण गुन्हेगारीकडे वळणार आहोत की एक सर्वसामान्य व्यक्ती चारित्र्यवान व्यक्ती म्हणून, समाजाचा जबाबदार घटक म्हणून राहणार आहोत हे ठरते. आज समाजात फोफावत चाललेला हिंसाचार, भ्रष्टाचार, आत्महत्या, घात पात, खून, धमक्या, ब्लॅकमेलिंग, मारहाणीच्या घटना, बलात्कार, वेगवेगळ्या प्रकारची फसवणूक, आर्थिक गुन्हे का वाढत आहेत? या प्रकारे वर्तणूक करताना लोकांना कायद्याची, पोलिसांची भीती का वाटत नाही? ज्यांना आपण फसवतोय, ज्यांना त्रास देतोय तो देखील माणूस आहे, त्याला पण कुटुंब आहे, त्याला पण समाजात प्रतिष्ठा आहे. मुलं-बाळं घरदार आहे हे आपण विसरून जातो आणि फक्त आपण गुन्हा करूनही कसे निष्कलंक आहोत याचे समर्थन करत असतो. आपण ज्याला फसवतो, ज्याच्यावर अन्याय, अत्याचार, मारहाण अथवा काहीही त्रासदायक करतो तेव्हा त्या व्यक्तीला त्याच्या कुटुंबाला काय भोगावं लागतं याचा थोडाही विचार गुन्हेगार करत नाही. स्वतःच्या मनाला, स्वतःच्या कुटुंबाला, आपण राहतो त्या समाजाला फसवताना, कुकर्म करताना गुन्हेगारीच्या वाटेवर वळताना लोकांना काहीच का वाटत नाही? या मागे त्यांची काय मानसिकता असते? गुन्हेगार तयार होण्यामागील सायकोलॉजिकल कारण काय यावर आपण जाणून घेऊयात. सोसोओपॅथी आणि सायकोपॅथी हे दोन घटक ठरवतात की एखादी व्यक्ती गुन्हेगारीकडे वळेल की नाही? या दोन प्रवृत्ती आपल्यामध्ये किती प्रमाणात आहेत या ठरवण्याचं कामं आपल्या मानसिकतेमधील काही मूलभूत घटक ठरवतात. कितपत आणि कितीवेळा एखादी व्यक्ती कोणत्या स्वरूपाचा गुन्हा करण्याची मानसिकता ठेवते हे त्याच्या मानस शास्त्रावरच अवलंबून असते. नार्सिसिजम (आत्म प्रीती वाद) Machiavellianism (उपपती) saradin froid (विवादास्पद) आणि sadism (दुसऱ्याच चांगला झालेला पाहून आनंद होणे) या चार वृत्ती आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये किती प्रमाणात आहेत यावरून आपल्यात कुठली मानसिकता जास्त घर करू शकते हे ठरते. आपल्याला आपल्या घरात, ओळखीत, समाजात कुठेही या वृत्तीची तीव्रता असलेले लोक असतील तर आपण त्यांना वेळीच आवरणे, सावरणे आवश्यक आहे. अशा व्यक्तीच्या छोट्या छोट्या वागणुकीतून, स्वभावातून, त्यांच्या जीवनात ते काय करतात, कसे जगतात त्यांनी सर्व प्रथम छोट्यातला छोटा अन्याय कोणावर केला? सर्वात पहिली फसवणूक कोणाची केली? हिंसाचार कुठे केला, कोणासोबत केला हे विचारात घेणे आवश्यक आहे.

दुर्दैवाने गुन्हेगारांचे समुपदेशन करताना खूपदा हेच लक्षात येते की, त्यांच्या अशा वृत्तीची सुरुवात त्यांच्या घरातूनच त्यांनी केलेली असते, दाखवलेली असते. त्यावेळी त्याकडे दुर्लक्ष केल्याने, त्याची बाजू सावरल्याने, त्याला पाठीशी घातल्याने किंवा भावनिक होऊन त्याचा विचार केल्याने पुढे हीच व्यक्ती घराबाहेर पण आपला तोच स्वभाव, तीच शैली, तोच खोटेपणा, लबाडी वापरून समाजात गुन्हे करताना आणि समाजाला उद्ध्वस्त करताना दिसते. अनेकदा असे पाहायला मिळते की, ज्या व्यक्तीमध्ये हे वरील घटक जास्त असतात त्या व्यक्ती गुन्हेगारी वृत्तीकडे वळण्याची शक्यता अधिक असते. बालपणी पालकांकडून झालेले दुर्लक्ष, लहानपणी सहन करावी लागलेली शारीरिक, भावनिक, मानसिक पिळवणूक, योग्य संस्कार न् मिळणे, बालपणी खूप अत्याचार, अन्याय, अपमानित होणे अशा गोष्टी घडल्या असतील तरी ही मुलं मोठी होऊन गुन्ह्यात पटकन ओढली जातात. झटपट पैसा मिळवणे, कष्ट करण्याची तयारी नसणे, खोटा मोठेपणा, रुबाब, श्रीमंती याच्या चुकीच्या कल्पना डोक्यात असणे या गोष्टी पुढे जावून कोणाच्याही मानसिकतेवर नकारात्मक परिणाम करत असतात. अनेकदा अशा व्यक्तिमत्त्वामध्ये, त्याच्या स्वभावात recidivism नावाचा घटक असतो. ज्यामुळे एकदा गुन्हा करून, त्यात पकडले जावून, त्याची शिक्षा भोगून देखील परत परत तोच गुन्हा करण्याची वृत्ती त्या व्यक्तीमध्ये निर्माण झालेली असते. यामुळे स्वतःला बदलून चांगल्या मार्गावर आणण्याची वृत्ती नाहीशी होते आणि स्वभावातील नकारात्मकता वाढत जाते.

सर्वसामान्य व्यक्तीला वाटते एखादा चोरी, घरफोडी करून तुरुंगात राहून आला, आता तो सुधारणार, त्याला पच्छाताप होईल, तो झालेल्या शिक्षेमुळे बदलेल पण दुर्दैवाने तसे न् होता भविष्यात तो अधिक मोठ्या चोऱ्या करू लागतो. एकदा तुरुंगात जावून आल्यावर पण त्याची मानसिकता का बदलत नाही? तर तिथे तो अनेक प्रकारच्या गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना भेटतो, तिथे त्याला गुन्हेगारी क्षेत्रामधील अधिक माहिती आणि ज्ञान मिळते. जास्तीत जास्त काय होतं, कायदा कसा कामं करतो, जामीन कसा मिळतो हे अट्टल गुन्हेगार पूर्ण अभ्यासून असतो. त्यातून तुरुंगातील संगत त्याचा आत्मविश्वास, बेरडपणा वाढवून त्याची नजर मरते, भीड चेपते. खूप क्वचित असे होते की, एकदा एका गुन्ह्यात शिक्षा भोगल्यावर ती व्यक्ती फिरून आयुष्यात परत चुकीच्या मार्गाला जात नाही. अन्यथा एक गुन्हा केला काय आणि दहा वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे केले तर काय कलम बदलतील, शिक्षेचा कालावधी बदलेल पण आपला हेतू तर साध्य होईल, आपल्याला जे हवं ते मिळवता येईल, जे करायचं ते करता येईल अशी भूमिका तयार होते. पकडले जाऊ तेव्हा बघता येईल तोपर्यंत तरी मनाप्रमाणे जगून घेऊ, कायद्याच्या पळवाटा शिकून घेऊ. गुन्हेगारी वृत्ती असलेल्या लोकांचे आदर्श पण त्याच क्षेत्रातले किंवा त्या सारखेच गुन्हे केलेले इतर लोक असतात.



समुपदेशन दरम्यान लक्षात येते की, दुसऱ्या आपल्यापेक्षा मोठ्या, कुविख्यात अथवा प्रतिष्ठित पण ज्याने गुन्हा करून तो त्यातून सहीसलामत सुटला, त्याचं कोणीच काही बिघडवू शकलं नाही, त्याला शिक्षा झाली नाही, कमी शिक्षा झाली अथवा सगळीकडेच असे गुन्हे घडतात, खूप लोकं असंच करतात या प्रकारचे समर्थन गुन्हेगार देताना दिसतात. ज्यांनी मोठे मोठे गुन्हे केले, जे त्यामुळे खूप प्रसिद्धीच्या झोतात आले किंवा ज्यांच्या भोवती खूप वलंय आहे, ज्यांचं गुन्हेगारी क्षेत्रात नाव आहे, ज्यांना सगळे घाबरतात, ज्यांची दहशत आहे असे लोकं नव्याने उदयाला येणाऱ्या गुन्हेगारांना खूप प्रेरणादायी वाटतात. आदर्शच चुकीचे असल्यामुळे त्यांना आपण पण काहीही करून त्यातून बाहेर पडू शकतो, हा चुकीचा, आत्मविश्वास निर्माण होतो आणि कायदा-सुव्यवस्था फाट्यावर मारण्याची त्यांची वृत्ती फोफावली जाते. यामुळे एकदा गुन्हा करून त्याचे परिणाम भोगून पण व्यक्ती परत परत ती गोष्ट करत राहते आणि कालांतराने आपण जे करतोय ते चुकीचं आहे, बेकायदेशीर आहे, हानिकारक आहे, अनैतिक आहे ही जाणीव नाहीशी होत जाते.

याबरोबरच मागील लेखात सांगितल्याप्रमाणे जर अशा गुन्हेगारांना पाठीशी घालणारे लोकं त्यांच्या आजूबाजूला अथवा संपर्कात असतील तर त्यांना घरातही धाक राहत नाही आणि आपण काही चुकीचं करतोय हा विचार पण त्यांना येत नाही. तरी आपण सगळ्यांनी हेच लक्षात घेतलं पाहिजे आपण कोणाच्याही गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी घालत नाही न्? आपल्याला त्यातून काही फायदा होतोय म्हणून स्वार्थी भावनेने आपण एखादा गुन्हेगार घडवत नाही न्? याचबरोबर आपला वापर कोणी कोणतेही प्रलोभण दाखवून चुकीच्या कामासाठी करत नाही न्, पावलोपावली आपण जे करतोय ते नीतिमत्ता आणि कायदा याला धरून आहे का हे पडताळून घेणे एक सुजाण नागरिक म्हणून आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

## थोडक्यात



### महिला बचत गटांना दिवाळी भेटवस्तू

**पुणे (आरंभ पर्व) :** राष्ट्रसेवा समूह आणि राजमाता जिजाऊ महासंघ धायरी यांच्यातर्फे किरकटवाडी,खडकवासला,गोऱ्हे आणि डोणजे भागातील महासंघाच्या शाखा असणाऱ्या महिला बचत गटातील महिलांना नेहमी प्रमाणे दिवाळी गिफ्ट चे वाटप करण्यात आले.आता पर्यंत गेली 15 वर्षांपासून दिवाळी गिफ्ट वाटप नियमित सुरू असून अनेकांना कर्ज रूपाने व्यवसायास आणि नित्य कामास मदत केलेली आहे. अनेक वर्षांपासून जिजाऊ महासंघाच्या माध्यमातून महिलांसाठी अनेक कामे करण्यात आलेली आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत कोट्यावधी रूपयांचे वाटप करण्यात आले आणि महिलांना आणि अनेक योजनांचा फायदा पोहचवला गेला आहे. या कार्यक्रमाप्रसंगी राजमाता जिजाऊ महिला महासंघाच्या अध्यक्षा स्मिता पोकळे,ज्योती कुंभार,रुपाली रायकर,सुजाता डोळस,गौरी कुंभार, भाग्यश्री काळे,अनिता साळवी यावेळी उपस्थित होत्या.

### लिफ्ट मागणाऱ्यांनी मोटार पळवली

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** लिफ्ट मागण्याच्या बहाण्याने गाडीत बसलेल्या दोघांनी चालकाला कोयत्याचा धाक दाखवत चारचाकी मोटार व मोबाईल फोन लंपास केल्याची घटना येथील पुणे-नाशिक महामार्गावरील खरपुडी फाटा येथे घडली. दरम्यान, प्रसंगावधान राखत शिरोली (ता. खेड) येते चालकाने चालत्या मोटारीतून उडी मारत स्वतःची सुटका करून घेतली. याप्रकरणी खेड पोलिसांत दोन संशयीतांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोटार चालक सचिन दगडू मोरडे (वय 43, रा. मोरडेवाडी, मंचर, ता.आंबेगाव) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. मोरडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ईटींगा चारचाकी मोटार (एम. एच. 14, के. एन. 3970) घेऊन गुरुवारी ते पुण्याहून मंचरकडे येत होते. संध्याकाळी सहा वाजता चाकण चौक ओलांडल्यानंतर राजगुरुनगरच्या दिशेने येत असताना दोन जणांनी लिफ्ट मागितल्याने मोरडे यांनी गाडी थांबविली. हिंदी भाषेत "आम्हाला संगमनेरला जायचे आहे. आमच्याजवळ पैसे नाहीत," अशी विनवणी त्यांनी केली. त्यावर "तुम्हाला मंचरपर्यंत सोडतो," असे मोरडे यांनी सांगितले. त्यानंतर एक जण मोरडे यांच्या शेजारी तर दुसरा मागील आसनावर बसला. खरपुडी फाटा येथे वीटभट्टीपर्यंत गाडी आल्यानंतर मागे बसलेल्याने "मला उलटी होते, गाडी थांबवा," असे सांगितल्यामुळे मोरडे यांनी मोटार रस्त्याच्या कडेला उभी केली. मोरडेही खाली उतरले. त्यानंतर सर्वजण पुन्हा गाडीत बसले. लगेचच पाठीमागे बसलेल्याने मोरडे यांच्या गळ्याला कोयता लावला. मोरडे यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केल्याबरोबर दुसऱ्याने मोरडे यांचे दोन्ही हात दोरीने बांधले व चालकाच्या आसनावरून ओढून मागच्या आसनावर आडवे झोपवले. आरोपींनी मोरडेंच्या खिशातील मोबाईल घेतला. फोन पे, गुगल पेचा पासवर्ड विचारला. परंतु मोरडे यांनी दिला नाही. त्यानंतर एकजण गाडी चालविण्यास बसला. गाडी थोडी पुढे गेल्यानंतर मोरडे यांनी प्रसंगावधान राखून चालू गाडीतून उडी मारली. हे चोरटे वाहन व मोबाईलसह राजगुरुनगरच्या दिशेने निघून गेले. मोरडे यांनी अन्य वाहनातून जाऊन खेड पोलिस ठाण्यात घटनेची माहिती दिली.



## बाप्पूसाहेब पोकळे यांच्या मागणीला यश

- पहाटेच धायरीतील खड्डे बुजवले

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी परिसरातील अनेक रस्त्याची चाळण झाली आहे. अनेक रस्त्यावर खड्डे पडले आहेत त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो आहे. या भागातील

DSK विश्व रोडवरती व मेघमल्हार परिसरामध्ये बरेच दिवस मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते . याबाबत धायरीचे युवा नेते बापूसाहेब बाबासाहेब पोकळे यांनी हे खड्डे त्वरित बुजवून घ्यावे अशी पुणे महानगरपालिकेकडे मागणी केली होती. त्यानंतर पहाटेच मनपाने हे सर्व खड्डे बुजवून नागरिकांना दिलासा दिला. पहाटे 2 ते 5 यावेळेत पोकळे यांनी स्वतः उपस्थित होऊन हे काम पूर्ण करून घेतले. या कामाबद्दल मनपा बरोबरच

पोकळे यांच्या पाठपुराव्याचेही नागरिक कौतुक व्यक्त करत आहेत.

## नऱ्हेकराचा निर्धार पक्का : पाण्याशिवाय नाही मताचा शिक्का

- जो पाणी देणार त्यालाच आम्ही आमदार करणार : भूपेंद्र मोरे यांचा पुन्हा एल्गार!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे परिसरातील पाणी टंचाईसाठी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी नुकतीच जो आम्हाला पाणी देणार त्यालाच आम्ही आमदार करणार ही मोहीम सुरू केली होती. त्यास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. विधानसभेची निवडणूक लागल्यानंतरही मोरे यांनी ही जल अभियान चळवळ सुरूच ठेवली आहे. नऱ्हेतील पाणीप्रश्न जो पर्यंत सोडवला जाणार नाही तोपर्यंत मतदान ही नाही असा एल्गार सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी केला आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये जाऊन तसेच पंधरा पंधरा वर्षे आम्हाला पाणी मिळत नाही. तर मतदान करायचेच कशाला ? यानिमित्त असा सवाल मोरे यांनी विचारला आहे. दरम्यान खडकवासला विधानसभा मतदारसंघातील काही इच्छुक उमेदवारांनी मोरे यांच्याशी पाणी प्रश्नाविषयी चर्चा केली .मात्र तरीही त्यांच्याकडून ठोस अशी कृती न झाल्याने मोरे यांनी आपले जल अभियान सुरूच ठेवले आहे. खडकवासला विधानसभा मतदारसंघाची निवडणूक अटीतटीची होणार आहे. त्यात मोरे व नागरिकांनी उभारलेले जल अभियान चांगलेच चर्चेत आहे. नऱ्हे भागातील विविध समस्यानी ग्रासलेले नागरिकानी विधानसभेत काही वेगळा निर्णय घेतला तर महायुतीला धक्का बसू शकतो. त्यामुळे भूपेंद्र मोरे यांच्या जल अभियानास मोठे महत्व निर्माण झाले आहे.





# खडकवासला विधानसभा मतदारसंघात बंडखोरी होणार?

## महाविकासआघाडी व महायुतीमध्येही सुप्त संघर्ष

**लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघाची निवडणूक लक्षवेधी असणार आहे. भारतीय जनता पार्टीचा हा बालेकिल्ला असलेला मतदारसंघ सध्या संक्रमणाच्या अवस्थेतून जात आहे. मतदारांची संख्या वाढलेली आहे तशी परिस्थिती ही बदलत आहे. यामुळे इच्छुकांची संख्या जास्तच वाढली आहे राष्ट्रवादी काँग्रेस पवार गटाकडून नऊ उमेदवार इच्छुक आहेत. तर भाजपकडून पाच उमेदवार इच्छुक आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून एक, राष्ट्रवादी काँग्रेस कडून तीन,शिवसेना ठाकरे गटाकडून दोन, मनसेकडून तीन, बहुजन समाज पार्टीकडून अरुण गायकवाड, शिवाय मयुरेश वांजळे ही निवडणूक लढवणार असल्याचे संकेत मिळत



आहेत. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची संख्या ह्या निवडणुकीतील एक संकेत देत आहेत. गेली तीन टर्म भाजप आ. भीमराव अण्णा तापकीर या मतदारसंघाचे नेतृत्व करत आहेत. मागील निवडणूक वगळता सर्व निवडणुका त्यांनी मोठ्या फरकाने जिंकल्या आहेत. मतदारसंघातील हजारो कोटीची विकास कामे, पक्षसंघटनेची पूर्ण ताकद त्यांची बलस्थाने आहेत. मात्र त्यांनाही उमेदवारीसाठी स्पर्धा करावी लागत असल्याचे चित्र दिसत आहे. इथे भाजपकडून माजी उपमहापौर ॲड.प्रसन्नदादा जगताप, दिलीपअण्णा वेडे पाटील, हरिदासजी चरवड, मंजुषा नागपुरे, राजाभाऊ लायगुडे इच्छुक आहेत. दुसरीकडे सर्वात तुल्यबळ समजला जाणारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण, मागील विधानसभेचे उमेदवार सचिन दोडके,नवनाथदादा पारगे, बाळाभाऊ धनकवडे यांच्यात उमेदवारीसाठी चुरस असल्याचे दिसून येते. शिवसेना ठाकरे गटाकडून नितीन वाघ, संदीप मते , वसंत मोरे इच्छुक आहेत. शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रमेश कोंडे यांनीही कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढवणार आहे असे विधान केल्याने तर्कवितर्क लावले जात आहेत. वांजळे परिवार ही खडकवासला विधानसभेसाठी ताकद लावणार असल्यामुळे मतदार संघातील कौल कोणाकडे झुकणार याकडेही लक्ष लागणार आहे. ह्या विधानसभा निवडणुका ह्या महाविकास आघाडी बरोबर महायुती तसेच तिसरी आघाडी,मनसे, स्वराज्य पक्ष, इतर छोटे मोठे पक्ष निवडणूक लढवणार आहेत. अशा परिस्थितीमध्ये खडकवासल्यामध्ये महाविकास आघाडीकडून एक व महायुतीकडून एक उमेदवार यांना संधी मिळणार आहे. अशा परिस्थितीमध्ये मागील काही महिन्यापासून जोरदार तयारी करणारे इच्छुक उमेदवार आघाडीचा व पक्षाचा निर्णय मान्य करणार की बंड करणार यावरही बरीच गणिते अवलंबून आहेत.

सध्या मतदारसंघातील चित्र पाहता महाविकासाआघाडी बरोबरच महायुतीलाही बंडखोरीचा सामना करावा लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे. काही इच्छुक उमेदवार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या ही संपर्कात असल्याची सूत्रांनी माहिती दिली आहे. ज्यांना उमेदवारी पक्ष नाकारतील ते उमेदवार इतर पक्षात जाणार की अपक्ष लढणार . पक्ष कशी समजूत काढणार. हेही महत्वाचे आहे. ते इच्छुक उमेदवार विधानसभेत कोणाचे काम करणार यावरही अवलंबून आहेत. शिवसेना ठाकरे गटाने ही जागा आपल्याकडे घेण्यासाठी ताकद लावली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरचंद्र पवार, भारतीय जनता पार्टी मध्येही सुप्त संघर्ष सुरू असल्याची चर्चा सातत्याने ऐकायला मिळत असते. त्यामुळे खडकवासल्यातील विधानसभा निवडणूक ही चांगलीच गाजणार असल्याचे संकेत मिळत आहेत.. ही विधानसभा निवडणूक अत्यंत अटीतटीची होणार यात शंका नाही. या परिस्थितीवर जो पक्ष चांगल्या प्रकारे परिस्थिती हाताळेल त्याना खडकवासल्याची निवडणूक जिंकणे सोपी जाणार आहे हे खरे आहे.

## उमेदवारीचा आत्मविश्वास ठेवून खडकवासला विधानसभा मतदारसंघात

# मा. सचिन दोडके "सुसाट"



**पुणे (दै. आरंभ पर्व)** खडकवासला विधानसभा मतदारसंघातील विविध रणधुमाळीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे इच्छुक उमेदवार मा. नगरसेवक सचिन दोडके यांनी होम टू होम प्रचार सुरू केला आहे. पक्षाची उमेदवारीची घोषणा बाकी आहे मात्र मोठ्या आत्मविश्वासाने खडकवासला मतदारसंघातील प्रत्येक भागात ते मतदारसंघ पिंजून काढत आहेत.



सचिन दोडके हे "सुसाट " झाल्याने खडकवासल्याच्या उमेदवारीबाबत ट्विस्ट येणार आहे की काय अशी चर्चा सुरू झाली आहे.

एकंदरीत सर्व इच्छुक उमेदवारापैकी सचिन दोडके यांनीही मीजास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे.

2019 च्या अल्प मतांच्या पराभवाचा बदला घेण्यासाठी आत्ता धेय्य गाठायचं ह्या एक लाईन खाली मतदारांशी त्यांचा संवाद सुरू आहे.

### मतदारांचा उस्फुर्त प्रतिसाद, परिवर्तनाचे संकेत : सचिन दोडके

विधानसभा मतदारसंघांमध्ये लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे. अनेक भागांमध्ये सोयी सुविधा नाहीत. काही ठिकाणी रस्तेही नाहीत. पाणीपुरवठाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मतदारांशी संवाद साधतोय. त्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. ते नक्कीच या विधानसभेला परिवर्तन करणार हा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये जाणवत आहे. जवळपास पहिला टप्पा पूर्ण केला आहे. उमेदवारीची घोषणा झाल्यानंतर लवकरच उमेदवारी दाखल करण्यात येईल व मतदारसंघात भेटीगाठी चालू राहतील. सर्व मतदारांसोबत पोहोचण्याचा माझा प्रयत्न आहे. यावेळी विधानसभेत नक्की पोहोचणार ही जिद्द व आत्मविश्वास नक्की आहे. - सचिन दोडके, मा. नगरसेवक / इच्छुक उमेदवार

त्यांचे बंधू संजय उर्फ बाबू दोडके हे ही कार्यकर्त्यां सोबत मतदारसंघात भेटी देत आहेत.

कार्यकर्त्यांची मोठी फळी या मतदारसंघात त्यांनी कार्यरत केली आहे. खडकवासला मतदारसंघातील एकंदरीत परिस्थिती पाहता हा मतदारसंघ परिवर्तनाच्या संक्रमणातून जात आहे.

या मतदारसंघाच्या समस्या, बदललेली राजकीय समीकरणे, पक्षांतर्गत सुप्त संघर्ष पहाता खडकवासल्यात परिवर्तन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सचिन दोडके यांना उमेदवारीसाठी बाबत पक्षांतर्गत स्पर्धा असली तरीही पूर्ण आत्मविश्वासाने ते निवडणुकीला सामोरे जात आहेत याचे मतदारसंघात सर्वांनाच आश्चर्य वाटते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने या खडकवासला विधानसभेसाठी सर्वे व मेरिट वर उमेदवारी देणार असल्याचे निश्चित केले असल्याने उमेदवारी बाबत दोडके ठाम आहेत.

मागील विधानसभेला जनतेच्या मनात शिरलेले दोडके यंदा उमेदवारी मिळून जिंकून विधानसभेत जाणार का याकडे सर्वांच्या नजरा आहेत.

## थोडक्यात



### कर्करोगाचा रुग्ण निश्चित बरा होतो

- महिला स्नेहमेळाव्यात डॉ. सुमित शहा यांचे प्रतिपादन
- प्रोलाईफ कँसर सेंटर येथे महिलांचा स्नेहमेळावा

**पुणे (आरंभ पर्व) :** प्रोलाईफ कँसर सेंटरमध्ये दहा ते बारा वर्षांपूर्वी उपचार घेतलेले काही रुग्ण असून ते ठणठणीत आहेत व इथे आले आहेत. कारण उपचारांबरोबरच रुग्णाची इच्छाशक्ती, कुटुंब आणि नातेवाईक हे यांचा सकारात्मक दृष्टिकोन फार महत्वाचा असतो. रुग्ण बरा झाला की त्याला सर्वसामान्य नागरिकांप्रमाणे जगता यायला हवे, त्यासाठी कर्करोग रुग्णाला सहानुभूती दाखवू नका. आज तुम्ही जे जमलेले आहात हे 'गॅदरिंग ऑफ स्ट्रेंथ' आहे. हीच सकारात्मक ताकत नवीन रुग्णाला ऊर्जा देते, असे मत गुलटेकडी येथील प्रोलाईफ कँसर सेंटरचे लॅप्रोस्कोपीक कॅन्सर सर्जन डॉ. सुमित शहा यांनी व्यक्त केले. प्रोलाईफ कॅन्सर सेंटर आणि रिसर्च इन्स्टिटयूट आयोजित स्तन कर्करोगाच्या प्रवासातील साहसी महिलांचा स्नेहमेळावा मंगळवारी दि. 22 रोजी गुलटेकडी प्रोलाईफ कॅन्सर सेंटर व रिसर्च इन्स्टिट्युट येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. स्तनांच्या कर्करोगाचा सामना करून उभ्या राहिलेल्या बहादुर महिलांच्या प्रवासाला सलाम करण्यासाठी आणि त्यांच्यातील आत्मविश्वास दृढ करण्यासाठी हा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कर्करोगामधून बरे झालेले रुग्ण उपस्थित होते.



### डाबर ओडोमोसने मेकिंग इंडिया डेंग्यू मुक्त मोहीम सुरू केली

- डेंग्यू आणि मलेरियाच्या प्रभावी प्रतिबंधासाठी जनजागृती करणे

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे, शहराला डासांपासून होणा-या रोगांशी लढा देण्यासाठी शहरांना अधिक प्रभावीपणे मदत करण्याच्या उद्देशाने, ओडोमोस, डाबरच्या भारतातील सर्वात आवडते वैयक्तिक ॲप्लिकेशन, भारताला डेंग्यू मुक्त बनवण्याचा मेगा उपक्रम सुरू करण्याची घोषणा केली . या उपक्रमांतर्गत, ओडोमोस थेट लोकांपर्यंत पोहोचतील आणि त्यांना डेंग्यू आणि मलेरियाच्या हानिकारक प्रभावांबद्दल आणि स्वतःचे संरक्षण कसे करावे याबद्दल शिक्षित करेल, तसेच त्यांना मोफत ओडोमोस मॉस्किटो रिपेलेंट क्रीम प्रदान करेल. डाबरने पुणे शहरात या मोहिमेचा शुभारंभ केला, जेथे 300 हून अधिक मुलांसह बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ प्राथमिक शाळेत विशेष जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले होते, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डाबर इंडियाचे दिनेश कुमार, उपप्रशासकीय अधिकारी शुभांगी चव्हाण, पर्यवेक्षिका सौ.आशादेवी धुमाळ, समग्र शिक्षा अभियानाच्या दळवी मॅडम, प्रभारी मुख्याध्यापक नितीन वाणी सर, शिक्षिका सुनीता जाधव, संजीवनी सोनार, आशा उंडे, प्रदीप गवळी, स्वाती लोहकरे, सुरेखा खैरे, पूजा घोगरे, अजय कोंढार, तुषार कोंढरे, डॉ. , रोहित सिरस्वाल, शाळा क्रमांक 118 बी. सर्व कर्मचारी व शिक्षक उपस्थित होते.

## इच वन टीच वन मोहिमेने साक्षरता क्रांतीला चालना



**पुणे (दै. आरंभ पर्व)** रायन इंटरनॅशनल अकॅडमी, हिंजवडीने रॉबिन हूड आमसोबत सहयोगाने जागतिक साक्षरता दिनी आपली वार्षिक मोहिम इच वन टीच वन यशस्वीरित्या सुरु केली. या उपक्रमाचा मन गाव, हिंजवडी येथील अनुदानित शाळेमधील वंचित विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देत शैक्षणिक तफावत दूर करण्याचा मनसुबा आहे. रॉबिन हूड आम ना-नफा तत्त्वावर आधारित स्वयंसेवी संस्था आहे, जी रेस्टॉरंट्समधील अतिरिक्त अन्न भारतातील आणि 10 इतर देशांतील शहरांमधील वंचितांपर्यंत पोहोचवण्याचे काम करते. सलग तिसऱ्या वष राबवण्यात आलेल्या या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्वयंसेवी पालक, विद्याथ, शिक्षण आणि शालेय मुख्याध्यापक यांनी एकत्र येऊन काम केले आणि या थोर कार्याप्रती त्यांचा वेळ व कौशल्य दिले. मन गावामधील शिक्षक व सामुदायिक सदस्यांनी दर वीकेण्डला मोफत क्लासेस उपलब्ध करून दिले.

## झेडपी शाळा, रायरेश्वर येथील विद्यार्थांना खाऊ वाटप

**पुणे लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)** रायरेश्वर - दाट झाडी, खोल दऱ्या, उंचच्या उंच सुळके, अस्ताव्यस्त पसरलेली पठारे, लांबच लांब सोंडा आणि आडवळणी घाट, अशा सह्याद्री पर्वतरांगामधील एक ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळाला भेट देण्यासाठी 28 जुलै 2023 रोजी संतोष कदम आणि मित्रपरिवार रायरेश्वर किल्ल्यावर पोहचले. पांडवलेणी जंगलात फिरत असताना पाय घसरून संतोष कदम पडले, पायाला मोठी इजा झाली. त्यामुळे हालचाल करणे शक्य नव्हते.



अशा परिस्थितीत कोणतीही मदत उपलब्ध नसताना येथील पर्यटकांना जेवण पुरवणारे योगेश जंगम यांच्याशी संपर्क करून तातडीने गावकऱ्यांच्या साहाय्याने स्ट्रेचरच्या मदतीने संतोष कदम यांना पायथ्याला आणण्यात यश आले. दत्ता जंगम, रुपेश जंगम, रोशन जंगम, लहू जंगम, संतोष कदम यांचे मित्र स्वप्नील गायकवाड, धरमसिंग, ऋषिकेश चाकणकर, रमेश निर्मळ यांनी या वेळी विशेष परिश्रम घेतल्यामुळे वेळेत उपचार मिळू शकले.

एक सामाजिक बांधिलकी आणि आपत्कालीन परिस्थितीत मदत केल्यामुळे संतोष कदम आणि मित्र परिवार पुणेच्या वतीने या मदतनीसांचा विशेष सत्कार व त्यांना स्ट्रेचर रायरेश्वर फोर्ट येथे जाऊन भेट देण्यात आले. त्याचबरोबर पुणे जिल्ह्यातील सर्वात उंचावर असणारी शाळा जिल्हा परिषद शाळा, रायरेश्वर. या शाळेत लोखंडी शिडीचा वापर करून शिक्षकानं जावं लागतं, त्या शाळेला व्यंकटसाई होंडा, न्यू अर्या फाउंडेशन आणि संतोष कदम मित्र परिवाराच्या वतीने टिफीन, टिफीन बॅग, पाणी बॉटल आणि खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक आत्माराम हांडे, उपशिक्षक सावता जगताप, संतोष कदम, सुहास बापू चाकणकर, स्वप्निल गायकवाड, संदीप चाकणकर, विक्रम चाकणकर, निलेश ससाने, ऋषिकेश चाकणकर उपस्थित होते.

## एम ओ सी कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटरच्या नवीन सेंटरचे उद्धाटन



**पुणे (दै. आरंभ पर्व)** भारतामध्ये एक वेगळं, पर्यायी आणि प्रभावी कॅन्सर केअर मॉडेल म्हणून सुरू झालेलं एम | ओ | सी कॅन्सर केअर आणि रिसर्च सेंटर हे आज देशातील सर्वात मोठं कम्युनिटी कॅन्सर केअर सेंटर चे नेटवर्क म्हणून नावारूपाला आले आहे. एम | ओ | सी ने आपल्या नव्या कॅन्सर केंद्राचं उद्धाटन आज दिनांक 20 ऑक्टोबर 2024 रोजी स्वारगेट येथे केले. पुण्यातील शिवाजीनगर आणि पिंपरी-चिंचवड येथील दोन कॅन्सर केअर केंद्रांनंतर हे एम | ओ | सी चे तिसरे कॅन्सर केअर सेंटर आहे. पुण्यातील रुग्णांना त्यांच्या नजीकच्या परिसरात, आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून आणि खिशाला परवडणारी कॅन्सर उपचार सुविधा उपलब्ध करून देण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न म्हणून हे केंद्र उभारण्यात आलं आहे. पुण्यातील प्रख्यात आणि अनुभवी कॅन्सरतज्ञ, डॉ. अश्विन राजभोज आणि डॉ. तुषार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एम | ओ | सी स्वारगेट येथील उपचार सुविधा कार्यरत राहतील. भारतामध्ये वेगवेगळ्या आनुवंशिक, पर्यावरण आणि जीवनशैलीशी संबंधित घटकांमुळे कॅन्सरच्या प्रकरणांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. कॅन्सरचे उपचार दीर्घकालीन असून उपचारांचा खर्च अवाजवी आणि सततचा असल्यामुळे अनेक रुग्ण आणि त्यांचे कुटुंबीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल होतात किंवा बरेचदा दारिद्र्यरेषेखाली ढकलले जातात. एम | ओ | सी, रुग्णांसाठी एक चांगली पर्यायी व्यवस्था ठरते कारण अत्यंत महागड्या कॅन्सर रुग्णालयांच्या तुलनेत तसेच रुग्णांनी खचाखच भरलेल्या सरकारी कॅन्सर रुग्णालयांपेक्षा, एम | ओ | सी चे विकेंद्रित (decentralized), कम्युनिटी कॅन्सर केअर मॉडेल रुग्णांच्या घराजवळ उच्च दर्जाच्या उपचाराची सुविधा, फार विलंब न लावता, सोयीस्कररित्या आणि परवडणाऱ्या किमतीत, अत्याधुनिक आणि सुरक्षित वातावरणात पुरवते. "आम्ही सुरू करीत असलेल्या प्रत्येक नवीन कॅन्सर केंद्राच्या माध्यमातून भारतातील कॅन्सरग्रस्तांचा प्रवास अधिक सुखकर करण्यासाठी प्रयत्नशील आहोत"; असं मत आमच्या प्रतिनिधींशी बोलताना डॉ. अश्विन राजभोज यांनी व्यक्त केलं.

## धोबीघाट रस्त्यावर मध्यरात्री चारचाकीचा अपघात !

**पुणे (दै. आरंभ पर्व)** शंकरशेठ रोड वरील धोबीघाटच्या मुख्य रस्त्यावर एक चार चाकी वाहन दुभाजकावर चढत रस्त्यावर उलटून पडले. रात्री 12 ते 12:15 च्या दरम्यान ही घटना घडली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. गाडीमध्ये तीन जण प्रवास करत असल्याची माहिती मिळाली. या रस्त्याच्या मधोमध असलेले दुभाजक हे पूर्णपणे मोडले आहे. त्यामुळे या रस्त्यावर अनेकदा छोटे मोठे अपघात घडत असतात. विशेषता रात्रीच्या वेळी हा मोडलेला दुभाजक वाहने चालवताना दिसत नाही. त्यामुळे गाड्या थेट दुभाजकाच्या वर चढतात. येथील रस्ता असमतोल



असून पूर्णपणे खराब झालेला आहे. पावसाळा आला की रस्त्यावर कायम मोठे खड्डे व खडी पडलेली असते. अनेकदा पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे तक्रार करूनही या गंभीर समस्याकडे बोर्डाकडून दुर्लक्ष केले जात असल्याची तक्रार प्रवासी व स्थानिकांनी केली.

### अॅमेझॉन एमएक्स प्लेयरच्या 'गेमिंग इन्सान'मध्ये निश्चय मल्हान ऊर्फ 'ट्रिगर्ड इन्सान'चा कंटेन्ट क्रिएटर ते प्रो-गेमर असा

## रोमांचक प्रवास पाहण्यासाठी व्हा सज्ज - ट्रेलर प्रदर्शित!

- 'गेमिंग इन्सान' ही सारिज 25 ऑक्टोबरपासून फक्त ॲमेझॉन एमएक्स प्लेयर वर मोफत पाहता येईल.




**मुंबई (दै. आरंभ पर्व)** ॲमेझॉनची मोफत व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने आज 'गेमिंग इन्सान' या आपल्या आगामी गेमिंग रिॲलिटी सीरिजची घोषणा केली. या मालिकेचा अधिकृत ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. यात लोकप्रिय भारतीय यूट्यूबर निश्चय मल्हान ऊर्फ 'ट्रिगर्ड इन्सान' दिसणार आहे. या शोमध्ये निश्चयचा प्रवास दाखवला आहे, ज्यात तो प्रोफेशनल ईस्पोर्ट्स ॲथलीट बनण्यासाठी 45 दिवसांच्या रोमांचक शोधयात्रेवर निघतो.

प्रो-गेमिंग क्षेत्रात आपली ओळख निर्माण करण्यासाठी तो घरातील सोयी-सुविधा सोडून बूट कॅम्पमध्ये राहतो, कठोर प्रशिक्षण घेतो आणि देशातील काही प्रतिभावान प्रो-गेमर्सशी स्पर्धा करतो. या रिॲलिटी शोमध्ये ईस्पोर्ट्सच्या चुरशीची स्पर्धा असलेल्या जगाचे दर्शन घडविण्यात आले आहे. निश्चय या जगात टिकून राहण्यासाठी प्रयत्न करत असताना प्रो-गेमर होण्यासाठी तो सामोरा जात असलेल्या शारीरिक आणि मानसिक आव्हानांचे साक्षीदार होण्याची संधी प्रेक्षकांना मिळणार आहे. ट्रेलरमध्ये निश्चयच्या कठीण प्रवासाची झलक दिसते. अभिषेक मल्हान आणि आशिष चंचलानी यांसारखे त्याचे कुटुंबीय व मित्र त्याच्या कंटेंट क्रिएटरपासून प्रो-गेमर होण्याच्या क्षमतेबद्दल शंका व्यक्त करतात. प्रोफेशनल ईस्पोर्ट्ससाठी आवश्यक असलेले कठोर प्रशिक्षण घेण्यास निश्चयची सुरुवात होते तेव्हा त्याला समजते की हा मार्ग अपेक्षेपेक्षा खूपच कठीण आहे. स्पर्धेतील जिद्द आणि नवीन जीवनशैलीशी जुळवून घेण्याच्या तणावामुळे निश्चय एका निर्णायक क्षणी माघार घेण्याचे ठरवतो. त्याच्यात हे आव्हान पेलण्याची क्षमता आहे का? की ही स्पर्धा त्याच्यासाठी खूपच कठीण ठरेल? हे प्रश्न या रिॲलिटी शोचे केंद्रबिंदू आहेत. निश्चय या अडथळ्यांवर मात करून प्रोफेशनल गेमर बनण्याचे स्वप्न साकार करतो का, हे तुम्हाला 'गेमिंग इन्सान'मध्ये जाणून घेता येणार आहे.

## थोडक्यात



### प्रिंट व डिजीटल मिडिया पत्रकार संघटनेची आढावा बैठक संपन्न

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** हवेली तालुका प्रिंट व डिजीटल मिडिया पत्रकार संघटनेची सुसंवाद बैठक उरुळी कांचन (ता. हवेली) येथील हॉटेल जानाई या ठिकाणी पार पडली. या बैठकीमध्ये प्रामुख्याने संघटनेची आगामी काळातील ध्येयधोरणे, संघटनेच्या सभासदांसाठी वेगवेगळे उपक्रम राबविणे, सभासदांकडून आलेल्या विविध सुचनांचा उहापोह करून सर्व संमतीने नवीन कार्यक्रम आयोजित करणे, सभासद व पदाधिकारी यांच्या संमतीने उपस्थित प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. संघटनेचे जिल्हा समन्वयक तुकाराम गोडसे यांच्या साप्ताहिकाला आरएनआय मिळाल्याबद्दल तसेच भाऊसाहेब महाडिक यांनी 25 ऑक्टोंबरला प्रसिद्ध होणारा मराठी चित्रपट 'नाद' या चित्रपटात छोटीसी भूमिका साकारली आहे. याबद्दल दोघांचेही संघटनेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी या वेळी प्रिंट व डिजिटल मिडियाचे राज्य अध्यक्ष सुनील जगताप, कार्याध्यक्ष जनार्दन दांडगे, पुणे जिल्हाध्यक्ष राजेंद्र काळभोर, तालुकाध्यक्ष संदीप बोडके, खजिनदार विजय काळभोर, ज्येष्ठ सल्लागार तुळशीराम घुसाळकर, राज्याचे समन्वयक तुकाराम गोडसे, सचिन सुंबे, चंद्रकांत दुंडे, अमोल अडागळे, जितेंद्र आव्हाळे, सुखदेव भोरडे, जयदीप जाधव, भाऊसाहेब महाडिक, रियाज शेख, शहाजी नगरे, अमोल भोसले, गोरख कामठे, हनुमंत चिकणे, सुधीर कांबळे, प्रवीण शेंडगे मोठ्या संख्येने उपस्थित होते. याबाबत बोलताना प्रिंट व डिजीटल मिडिया पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र काळभोर म्हणाले, 'माध्यमांच्या बदलत्या स्वरूपानुसार पत्रकारांनी स्वतःमध्ये बदल घडवून आणणे गरजेचे आहे. तेव्हाच या स्पर्धेच्या युगात ते तग धरू शकतील'. प्रिंट व डिजीटल मिडिया पत्रकार संघ हा पत्रकारांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार हवेली तालुका अध्यक्ष संदीप बोडके यांनी मानले.

### होर्डींगवरील फ्लेक्स हातगाडीवर पडला, भाजी विक्रेते दाम्पत्य जखमी

**वाघोली (आरंभ पर्व) :** मंगळवारी रात्री झालेल्या पावसाने वाघोलीतील केसनंद फाटा परिसरात होर्डींग वरील फ्लेक्सचां कपडा फाटून हातगाडीवर पडल्याने भाजी विक्रेत्याचे नुकसान झाले. यामध्ये भाजी विक्रेते दाम्पत्य किरकोळ जखमी झाले. वाघोलीत रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास जोरदार पाऊस वारे सुरू झाले. सुमारे अर्धा ते पाऊण तास पाऊस सुरू होता. केसनंद रोड वर अनेक विक्रेते फळ, भाजीचे दुकाने लावतात. येथील शिवम मेडिकल समोर विनोद व यमुना कापटे यांची भाजीची हातगाडी असते. वाऱ्यामुळे तेथील होर्डींग वरील फ्लेक्सचा कपडा फाटून सरळ हातगाडी वर पडला. वाघोली परिसरात पुणे नगर महामार्गावर दुभाजकावर असणाऱ्या प्रत्येक विद्युत पोलवर अनेक अनधिकृत जाहिरात फलक लावले आहेत. या फलकामुळे शहराचे विद्रुपीकरण तर होतेच. शिवाय हे फ्लेक्स महामार्गावर पडून अपघातास कारणीभूत ठरतात. सध्या निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. या फ्लेक्स मध्ये काही राजकीय फ्लेक्स ही आहेत.

# मनाच्या आजाराची लक्षणे जाणून घ्यायला हवीत

## डॉ. विद्याधर बोरकर : जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मराठी विज्ञान परिषदेतर्फे 'मनाच्या कथा आणि व्यथा' विशेष कार्यक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"मन म्हणजे मेंदूच्या क्षमतेचा आपली वर्तणूक, आकलन, स्मरणशक्ती, भावना यांच्यावर असलेला प्रभाव होय. मेंदू हा शरीराचाच भाग असल्याने मनोविकरांची लक्षणे आपल्या वर्तणुकीतल्या बदलांनी किंवा अन्य शारिरीक व्यथांद्वारे प्रकट होतात. रक्तदाब, छातीतली धडधड, निद्रानाश अशी ही लक्षणे असू शकतात. ही लक्षणे मानसिक आजारांमुळेच दिसत आहेत का, हे तज्ञांकडून तपासून घ्यावे लागते. मानसोपचार तज्ज्ञांकडून उपचार घेण्यात कसलाही कमीपणा मानू नये. किंवा संकोच करू नये. मनाच्या आजारांचे गांभीर्य लक्षात घेऊन वेळीच उपचार




घेणे महत्वाचे असते," असे मत विज्ञान अभ्यासक व आघारकर संशोधन संस्थेतील निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. विद्याधर बोरकर यांनी व्यक्त केले. मराठी विज्ञान परिषद व भावार्थ यांच्या वतीने जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त 'मनाच्या कथा आणि व्यथा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कर्वे रस्त्यावरील भावार्थच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात मनोवैज्ञानिक भूषण सुकेशिनी वामनराव, आणि मराठी विज्ञान परिषदेचे उपाध्यक्ष विनय र. र. आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. बोरकर यांनी मानसिक स्वास्थ्यावरील आपल्या 'त्या बुधवारी' या कथेचे अभिवाचन केले. भूषण यांनी मनोविकारापासून दूर राहण्यासाठी कोणती काळजी घ्यावी? यावर भाष्य केले. डॉ. विद्याधर बोरकर म्हणाले, "आपल्याला आलेले अनुभव, भेटलेली माणसे सतत काही तरी शिकवत असतात. त्यातून आपण अधिक सक्षम बनत असतो. मन आजारी पडू शकते, या गोष्टीचा स्वीकार करायला हवा. मानसिक तणावाचे गांभीर्य लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. मानसिक तणाव जाणवत असेल, तर लवकरात लवकर उपचार घ्यावेत. ध्यान हे मनाचे खाद्य आहे. ध्यान म्हणजे कोणतीही गोष्ट सजगपणे करणे. जाणीवपूर्वक एखाद्या चांगल्या कृतीत मन रमवणे. मनाला शांत करणारी ध्यान ही एकमेव गोष्ट आहे" ताप आला, अंग दुखले, अशा शारीरिक आजारांसाठी आपण औषधोपचार करतो. कारण शारीरिक आजारांबद्दल समाजात माहिती आणि जागरूकता आहे. मात्र मानसिक अस्वास्थ्याबद्दल समाजात जागरूकता नाही. सत्यजित बेडेकर यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'मन मनास उमगत नाही' हे गीत सादर केले. तर कार्यक्रमाचा समारोप कबीरांच्या भजनाने केला. आभार अंजली साठे यांनी मानले.

## विद्यार्थी व शिक्षक अभ्यास दौऱ्यावर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वैश्विक शैक्षणिक समरसता कार्यक्रमांतर्गत सूर्यदत्त इन्स्टिट्यूट्स ऑफ मॅनेजमेंटचे विद्यार्थी व शिक्षक यांचा एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीला 18 ते 26 ऑक्टोबर 2024 या कालावधीत 9 दिवसांचा अभ्यास दौरा आयोजिला आहे. ही टीम नुकतीच थायलंडला पोहोचली. वैश्विक समरसता कार्यक्रमात एआयटीमध्ये चार दिवसांचा दौरा असून, येथे एआयटीमधील तज्ज्ञ प्राध्यापकांची अभ्यागत व्याख्याने, कॅम्पस सहल, नेटवर्किंग, रॉबर्ट बॉश, सियाम सिमेंट ग्रुप अशा उद्योगांना भेटी असतील. दोन दिवस पटाया येथे सांस्कृतिक कार्यक्रमांची देवाणघेवाण होईल. त्यानंतर बुद्ध मंदिराचे दर्शन व फ्लोटिंग मार्केटला भेट होणार आहे, अशी माहिती सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया दिली. परस्पर शैक्षणिक सहकार्य आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सने अलीकडेच एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी संस्थेसोबत



सामंजस्य करार केलेला आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापकांची देवाणघेवाण, क्षमता संवर्धन आणि इतर परस्पर फायद्याच्या उपक्रमांना चालना देण्याचा या सामंजस्य कराराचा उद्देश आहे. त्याअंतर्गत हा अभ्यास दौरा होत आहे. या वैश्विक समरसता कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना बँकॉक या व्हायब्रँट शहरात शैक्षणिक समरसता, औद्योगिक अनुभव आणि सांस्कृतिक समृद्धी यांचे एक अद्वितीय मिश्रण अनुभवता येणार आहे. यातून त्यांना एक सर्वसमावेशक, समृद्ध आणि परिवर्तनशील शैक्षणिक अनुभव मिळणार असून, सांस्कृतिक समरसता आणि करिअर वाढीच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

## पोलिओ संपवण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे - डॉ. प्रशांत उदावंत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

24 ऑक्टोबर या जागतिक पोलिओ दिनानिमित्त, पोलिओमायलिटिसमुळे निर्माण होणारा सततचा धोका ओळखणे आवश्यक झाले आहे. विशेषतः मेघालयात पोलिओचा रुग्ण आढळल्याने याची भीती आणखी वाढली आहे. पोलिओचे सूक्ष्म विषाणू असतात. ते अन्न पाण्यामार्फत तोंडावाटे शरीरात येतात. दूषित पाणी हेच त्यांचे मुख्य वाहन आहे. यात हे विषाणू 6 महिनेपर्यंत जिवंत राहू शकतात. विष्ठेमार्फत हे विषाणू पाणी, जमीन वगैरेमध्ये पसरतात. याचा सर्वाधिक फटका पाच वर्षाखालील मुलांना प्रभावित करतो, ज्यामुळे पक्षाघात होतो आणि काही प्रकरणांमध्ये मृत्यूही होतो. अनेक दशकांची प्रगती असूनही, हा आजार विशेषत: भारतासारख्या देशांसाठी पोलिओमुक्त असतानाही जागतिक आरोग्या धोका म्हणून राहिला आहे. त्यामुळे पोलिओ पुन्हा पसरू यासाठी सतर्क राहणे आवश्यक आहे.



रुबी हॉल क्लिनिक येथील निओनॅटोलॉजीचे प्रमुख आणि बालरोगशास्त्रातील वरिष्ठ सल्लागार डॉ. प्रशांत उदावंत यांनी सांगितले की, पोलिओविरुद्धची लढाई लगेच संपणारी नाही. पोलिओ व्हायरसला परत येण्यासाठीची कोणतीही संधी न देणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच इनॲक्टिव्हेटेड पोलिओ लस (आयपीव्ही) सह सहा आठवड्यांपासून लसीकरण सुरू करणे महत्त्वाचे आहे. हे लसीकरण एक ढाल तयार करते जे केवळ मुलाचेच नव्हे तर समुदायाचे संरक्षण करते.

भारताचा 12 वर्षांचा पोलिओमुक्त दर्जा हा व्यापक लसीकरण मोहिमांचा परिणाम आहे. डब्ल्यूएचओच्या मते, भारतात पोलिओ लसीचे जवळपास 1 अब्ज डोस दरवर्षी दिले जात होते, जे निर्मूलनापर्यंत नेणाऱ्या अंतिम वर्षांमध्ये 172 दशलक्ष मुलांपर्यंत पोहोचले. तरीही, जगाच्या इतर भागांमध्ये अलीकडील उद्रेक जागृत राहण्याच्या गरजेची स्पष्ट आठवण करून देतात³ डॉ. उदावंत पुढे म्हणाले की, पोलिओ अनेकांना दूरच्या स्मृतीसारखे वाटू शकते, परंतु हा एक मूक धोका आहे जो अजूनही जगाच्या काही भागात अस्तित्वात आहे. आमची सुरक्षा कमी होणे आम्हाला परवडणारे नाही. उच्च लसीकरण कव्हरेज टिकवून ठेवणे हे आमचे सर्वोत्तम संरक्षण आहे. लस आणि लसीकरण पद्धती (आयएपी एसीव्हीआयपी) वरील भारतीय बालरोग सल्लागार समिती शिफारस केलेल्या लसीकरण वेळापत्रकाचे बारकाईने पालन करण्याच्या गरजेवर भर देते. यामध्ये जन्माच्या वेळी, 6, 10 आणि 14 आठवड्याच्या वेळी पोलिओ लस (ओपीव्ही) द्यावी तसेच 16-18 महिन्यांत आणि पुन्हा 4-6 वर्षांनी बूस्टर डोस देणे समाविष्ट आहे. या शेड्यूलचे पालन करणे वैयक्तिक आणि सामूहिक प्रतिकारशक्ती राखण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

**पूर्वीच्या सुरक्षित प्रदेशांमध्ये पोलिओचा उद्रेक आणि लस-व्युत्पन्न प्रकरणे लसीकरणाचे प्रयत्न कायम न ठेवल्यास रोग किती लवकर परत येऊ शकतो हे दर्शविते. मोठ्या लोकसंख्येसह आणि दाट लोकवस्ती असलेल्या भारताला पोलिओचा पुन्हा उदय झाल्यास विशिष्ट धोक्याचा सामना करावा लागतो. प्रत्येक मुलाला लस मिळेल याची खात्री करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. डॉ. उदावंत यांनी इशारा देताना म्हटले की, पूर्वी सुरक्षित समजल्या जाणाऱ्या ठिकाणी पोलिओचे पुनरुत्थान हे सर्व राष्ट्रांसाठी एक वेक अप कॉल आहे. हा विषाणू भारतात परत येऊ नये याची खात्री करण्यासाठी नियमित लसीकरण महत्त्वपूर्ण आहे, अन्यथा त्याचे भयानक परिणाम होउ शकतात.**

## शिरुर - हवेलीत महाविकास आघाडीला भगदाड : माऊली कटके यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजितदादा गट) प्रवेश

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

शिरूर- हवेली विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीला मोठे भगदाड पडले असुन शिवसेनेचे (ठाकरे गट ) माजी जिल्हाप्रमुख व माजी जिल्हा परिषद सदस्य माऊली कटके यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) पक्षात प्रवेश केला आहे .

मुंबई येथे अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत माऊली कटके व त्यांच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश केला. त्यामध्ये शिवसेनेसह (ठाकरे गट) राष्ट्रवादी काँग्रेसच्या ( शरद पवार गट ) कार्यकर्त्यांचा समावेश आहे.त्यामध्ये

पेठचे आदर्श सरपंच सुरज चौधरी ,नायगावचे आदर्श सरपंच गणेश चौधरी ,नायगावचे माजी ग्रामपंचायत सदस्य कृष्णा आप्पा चौधरी ,उद्योजक सुजित चौधरी , संतोष



हागवणे सुनिल हगवणे , वडगाव रासाई ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत सदस्य रवींद्र शेलार ,कोलवडीचे लोकनियुक्त सरपंच विनायक गायकवाड , माजी उपसरपंच नाना गायकवाड आदींचा समावेश असुन यामुळे शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे .यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे ,हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष दिलीप वाल्हेकर उपस्थित होते .

येणाऱ्या विधानसभेत ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित दादा गट) सुटणार असल्याची शक्यता असून माऊली कटके हे महायुती कडून निवडणूक लढविणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे.आगामी विधानसभा निवडणुका तोंडावर येऊन ठेपलेली असताना शिरूर हवेलीच्या राजकारणामध्ये झपाट्याने बदल घडत आहेत, या मतदारसंघात महाविकास आघाडी कडून उमेदवारी फायनल झाल्यानंतर अनेक बदल घडू लागले आहेत.

मोठी मतदार संख्या असणाऱ्या वाघोली गावांमधील इच्छुक उमेदवार माऊली कटके यांनी आज महाविकास आघाडी मधील शिवसेना उद्धव ठाकरे गटाला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटामध्ये जाहीर प्रवेश केल्याने राजकीय समिकरणे बदलली आहेत . त्यामुळे शिरूर - हवेली विधानसभा मतदार संघामध्ये आमदारकीची निवडणूकी मध्ये जोरदार लढत पहायला मिळण्याची शक्यता असून संपूर्ण राज्याचे लक्ष या मतदारसंघाकडे लागले आहे .कटके यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून निवडणुकीची जोरदार तयारी केली आहे . त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूक चुरशीची होणार अशी चिन्हे दिसत आहेत . कटके यांच्या पक्षप्रवेशामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे .

# 'रयत'ने घडवले; 'रयते'साठी योगदान देता आल्याचे समाधान

## चंद्रकांत दळवी यांची भावना; विचारवेध संमेलनात 'रयतेपासून रयतेपर्यंत'वर प्रकट मुलाखत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"कर्मवीर भाऊराव पाटील (अण्णा) यांनी खेडोपाडी उभारलेल्या शाळांमुळे गोरगरीब घरातील मुलामुलींना शिकता आले. माझेही शिक्षण अण्णांनी उभारलेल्या 'रयत'मध्येच झाले. तिथेच माझी जडणघडण झाली. रयतेच्या कल्याणासाठी जगण्याचा संस्कार घेऊन प्रशासकीय सेवेत असताना, तसेच सेवापूर्तीनंतर 'रयते'साठी योगदान देता येतेय, याचे समाधान आहे," अशी भावना रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन व माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी व्यक्त केली.

बंधुता लोकचळवळीच्या



सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विश्वबंधुता साहित्य परिषद आणि रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रयत विचारवेध संमेलनात चंद्रकांत दळवी यांची प्रकट मुलाखत झाली. साहित्यिक प्रा. शंकर आथरे व कवयित्री संगीता झिंजुरके यांनी त्यांच्याशी संवाद साधला. नवी पेठेतील पत्रकार भवनात झालेल्या कार्यक्रमात संमेलनाध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे, स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. अरुण आंधळे आदी उपस्थित होते.चंद्रकांत दळवी म्हणाले, "आजोबा वारकरी संप्रदायात, तर वडील लष्करात असल्याने समाजाप्रती बांधील राहण्याचे संस्कार मिळाले. 'रयत'मध्ये असताना समता, बंधुता, स्वावलंबन आणि समर्पण आत्मसात केले. प्रशासकीय सेवेत आल्यावर रयतेच्या हिताचे निर्णय घेण्यावर भर दिला. सामान्यांचे, वंचितांचे व गोरगरिबांचे प्रश्न सोडवण्यासाठी, स्वच्छ प्रशासन व वेळेत सेवा देण्यासाठी काम केले. लोकांचे कल्याण हाच विचार मनात असायचा. कारण तो रयत शिक्षण संस्थेत असताना खोलवर रुजलेला होता. 'झिरो पेंडन्सी'सारखे उपक्रम राज्यातील जनतेच्या हिताचे ठरले. सेवेत असताना सर्वांशी बंधुभाव जोपासल्यानेच आजही लोकांचे प्रेम मिळते. बंधुता परिवाराशी जोडल्याने बंधुतेचा विचार आणि अण्णांनी दिलेला समतेचा विचार घेऊन सुदृढ समाजाची निर्मिती व्हावी, यासाठी प्रयत्नशील आहे." "उपजिल्हाधिकारी झालो, त्याचवेळी माझ्या गावातील शाळेला नववीपासूनचे वर्ग बंद करण्याचे आदेश मिळाले होते. पण लोकांच्या सहभागाने आज ही शाळा सर्वोत्तम बनली आहे. महसूल खात्यात काम करताना ई-महाभूमी उपक्रमाने जागांच्या नोंदी सुलभ झाल्या. संत गाडगेबाबा ग्राम स्वछता अभियान, हागणदारीमुक्त गाव योजना अशा उपक्रमांतून समाजपरिवर्तन झाले. आपल्या कार्यकाळात रयतेसाठी अनेक योजना राबवल्या आणि त्याचा लाभ त्यांना झाला, याचे समाधान आहे. आपण समाजाचे देणे लागतो, या भावनेतून रयत शिक्षण संस्थेशी जोडला गेलो. व्यवस्थापन सदस्य म्हणून सुरुवात करून विविध पदांवर काम केल्यानंतर आता संस्थेचा चेअरमन म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. जिथे शिकलो, त्याच संस्थेचा चेअरमन होणे, ही गोष्ट अभिमानास्पद आणि आनंद देणारी आहे," असे चंद्रकांत दळवी यांनी नमूद केले. प्रकाश रोकडे यांनी अध्यक्षीय समारोपात रयतेपासून रयतेपर्यंतचा प्रवास उलगडताना प्रशासकीय अधिकारी कसा, असावा याचे दर्शन चंद्रकांत दळवींच्या रुपात घडत असल्याचे सांगितले. रयत शिक्षण संस्थेने कायमच समता आणि बंधुतेची शिकवण विद्यार्थ्यांना दिली आहे. आजच्या या अस्थिरतेच्या काळात स्वातंत्र्य, न्याय यासोबतच समता आणि बंधुतेची तीव्रतेने गरज आहे. हाच विचार घेऊन आपण पुढील वाटचाल करत राहायला हवे. तत्पूर्वी, दुपारच्या सत्रात पल्लवी उमरे (नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात मराठी काव्यपंढरी काव्यसंमेलन झाले. ज्येष्ठ कवी प्रा. चंद्रकांत वानखेडे, डॉ. अशोककुमार पगारिया, मधुश्री ओव्हाळ, गुलाबराजा फुलमाळी यांच्यासह निमंत्रित कवींनी यात सहभाग घेतला. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी डॉ. प्रभंजन चव्हाण, बंडोपंत कांबळे व प्रा. प्रशांत रोकडे यांनी विशेष पुढाकार घेतला. प्रा. डॉ. अरुण आंधळे यांनी आभार मानले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.